# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३८५-२२ दिनांक १५/१२/२०२२

## महागडया कारचे म्युझिक सिस्टीम / टेप चोरी करणारे सराईत आरोपीत जेरबंद गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांची कामगिरी.

दिनांक ०३/१२/२०२२ रोजी १४.३० वा. ते दिनांक ०५/१२/२०२२ रोजी सकाळी ९.४५ वा. चे दरम्यान फिर्यादी नामे श्री. देवेंद्र खेमराज जैन, वय ४८ वर्षे, विरार पुर्व, ता.वसई, जि. पालघर यांनी त्यांची टोयोटा कंपनीची इनोव्हा कार क्रमांक एम.एच.४८.एस. ०८७९ ही श्रमसाफल्य बिल्डींग, विर सावरकर रोड, भोलानाथ फर्निचर समोर, विरार पुर्व येथे पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजुकडील दरवाज्याची काच तोडुन, नुकसान करुन कारमधील टोयोटो कंपनीचा कारटेप फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायदयाकरीता चोरी केल्याबाबत फिर्यादी यांनी समक्ष विरार पोलीस ठाणे येथे येवून तक्रार दिल्याने विरार पोलीस ठाणेस गुन्हा रजि नंबर ११४४/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७९, ४२७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन महागडया कारचे काच फोडुन म्युझिक सिस्टीम / कार टेप चोरीच्या गुन्हयाच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होवून सदर गुन्हे करणारी टोळी अधिक सक्रीय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन गुन्हयांना आळा घालण्यासाठी तसेच दाखल गुन्हयांचा तपास करुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष ३ कडे वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्हयात तांत्रिक विश्लेषण व मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीत नामे १) जुबेर रईस अहमद, वय ३२ वर्षे, २) शहनवाज मोहम्मंद अलियार खान, वय १९ वर्षे, दोन्ही रा- तळोजा, नवी मुंबई यांना दिनांक ०९/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली. व आरोपीत नामे ३) परवेज इकबाल सैय्यद, वय ३६ वर्षे, रा. कुर्ला कपाडीया नगर, सी.एस.टी. रोड, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७० यास दिनांक १२/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली. नमूद आरोपीतांकडून गुन्हा करण्याकरीता वापरण्यात आलेली एक आय १० कार, एक स्विफ्ट कार व चोरी केले २० म्युझिक सस्टीम / कारटेप असा एकूण १०,३२,१६०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन खालील १५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

### उघडकीस आलेले गुन्हे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे | ११४३/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ |
| २. | विरार पोलीस ठाणे | ११४४/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| ३. | विरार पोलीस ठाणे | गु.र.नं. ११४६/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| ४. | विरार पोलीस ठाणे | गु.र.नं. ११५०/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| ५. | विरार पोलीस ठाणे | गु.र.नं. ७३३/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| ६. | विरार पोलीस ठाणे | गु.र.नं. ७३२/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ |
| ७. | तुळींज पोलीस ठाणे | गु.र.नं. ७६७/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| ८. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.नं. ५८३/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.नं. ३६०/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| १०. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.नं. ४३७/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| ११. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.नं. २७६/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ |
| १२. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | गु.र.नं. २५१/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ |
| १३. | नयानगर पोलीस ठाणे | गु.र.नं. ५५८/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |
| १४. | काशिमीरा पोलीस ठाणे | गु.र.नं. ५१८/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ |
| १५. | विठ्ठलवाडी पोलीस ठाणे ( ठाणे शहर ) | गु.र.नं. ३७४/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९,४२७ |

आरोपीत क्रमांक १ हा कारटेप चोरीचा सराईत आरोपी असुन त्याचेवर कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र मधील विविध ठिकाणी ३५ पेक्षा जास्त गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सागर बारवकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविन वानखेडे सर्व नेम. गुन्हे शाखा, कक्ष ३ तसेच स.फौ. चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.




-----0000-----